आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२ ऑक्टोबर २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५५व्या तर देशाचे दुसरे प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांच्या १२०व्या जयंतीनिमित्त देशाची आदरांजली

- स्वच्छ भारत अभियानाची दशकपूर्ती सर्वत्र साजरी, राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन

- पुण्यात बावधन इथं हेलिकॉप्टर दुर्घटनेत तीन जणांचा मृत्यू

- बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातला मुख्य आरोपी अक्षय शिंदे याच्या मृत्यूचा तपास करण्यासाठी न्यायालयीन आयोगाची स्थापना

**आणि**

- पहिली खो-खो विश्वचषक स्पर्धा पुढच्या वर्षी भारतात होणार

**<><><><><>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि देशाचे दुसरे प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त देश आज त्यांना आदरांजली वाहत आहे. महात्मा गांधी यांची आज १५५ वी जयंती असून त्यानिमित्त देशासह परदेशातही विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि केंद्रीय मंत्र्यांनी नवी दिल्लीतल्या महात्मा गांधींच्या राजघाट इथल्या समाधीस्थळी पुष्पांजली अर्पण केली. त्यानंतर त्यांनी माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांच्या १२०व्या जयंतीनिमित्त विजयघाट इथल्या समाधीवर आदरांजली अर्पण केली.

आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२ ऑक्टोबर २०२४ - बुधवार

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गांधी जयंती निमित्त नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

गांधी जयंतीनिमित्त आज सर्वत्र स्वच्छता दिवस साजरा करण्यात येत आहे. स्वच्छ भारत अभियानाला दहा वर्ष पूर्ण झाल्या निमित्त नवी दिल्ली इथं आयोजित कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांसमवेत भाग घेतला. यावेळी स्वच्छतेशी संबंधित नऊ हजार सहाशे कोटी रुपयांच्या अनेक प्रकल्पांचा प्रारंभ त्यांच्या हस्ते झाला. यात अमृत प्रकल्प स्वच्छ गंगा राष्ट्रीय अभियान आणि गोबरधन योजनेअंतर्गत १५ बायोगॅस प्रकल्पांचा समावेश आहे. या वेळी अमृत २.० योजनेंतर्गत सातारा पालिकेच्या स्वयंचलित पाणीपुरवठा प्रकल्पाचं तसंच नळजोडण्यांना अद्ययावत मीटर बसवण्याच्या कामाचं मोदी यांनी दूरस्थ पद्धतीने उद्घाटन केलं. स्वच्छता ही प्रत्येकाची जबाबदारी असून यासाठी प्रत्येकानं कार्यरत राहणं गरजेचं आहे, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. स्वच्छता पंधरवड्याच्या सांगतेनिमित्त देशभरात विशेष कार्यक्रम होत आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या स्वच्छ भारत अभियानाला आज १० वर्ष पूर्ण झाली आहेत. ही राष्ट्रीय स्तरावरची मोहीम २ ऑक्टोबर २०१४ रोजी सुरू झाला. त्यामुळे ५ लाख ५४ हजार गावांना हगणदारीमुक्त गावांचा दर्जा मिळाला आहे. त्याचबरोबर ११ कोटी ६५ लाख घरगुती शौचालये बांधण्यात आली. २०१४ ते २०१९ या वर्षात अतिसारामुळे होणारे लाखो मृत्यू रोखण्यात आले आहेत, असं जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालात म्हटलं आहे. त्याचबरोबर स्वच्छतेमुळे माता आणि बालकांचा मृत्यू दर कमी झाला आहे. देशात या मोहिमेमुळे ला◌ेकांच्या

जीवनात गुणात्मक परिवर्तन झाल्याचं मत भाजपा अध्यक्ष जे पी नड्डा यांनी समाजमाध्यमावर व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय महामार्गाच्या बांधणीच्या सामग्रीमध्ये ८० लाख टन विलगीकृत कचऱ्याचा वापर करण्यात आला असल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितिन गडकरी यांनी आज नागपुरात सांगितलं. महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त नागपूर महापालिकेतर्फे आयोजित श्रमदान कार्यक्रमात ते बोलत होते. नागपूर महानगरपालिकेमध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी औष्णिक वीजनिर्मिती प्रकल्पाला पुरवलं जातं. पेंच, कोराडी, खापरखेडा या प्रकल्पातल्या राखीव पाण्याचा वापर आता शेतकऱ्यांना सिंचनासाठी होत असल्याची माहितीही गडकरी यांनी दिली. कचऱ्यापासून बायो-सीएनजीची निर्मिती शक्य असून महानगरपालिकेनं आता आपल्या ताफ्यातल्या वाहनांमध्ये अशा इंधनाचा वापर सुरू करावा, अशा सूचनाही गडकरी यांनी यावेळी केल्या.

**<><><><><>**

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित **नांदेड** पोलीस परिक्षेत्रातल्या नांदेड, लातूर, परभणी आणि हिंगोली जिल्ह्यात आजपासून व्यसनमुक्त गाव मोहिम राबवली जाणार आहे. त्या व्यतिरिक्त या पोलीस परिक्षेत्रातल्या चारही जिल्ह्यांमध्ये तंटामुक्त गाव समित्या स्थापन केल्या जाणार  आहेत.

महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त **धुळे** जिल्हाधिकारी कार्यालयात आज अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

**राष्ट्रपिता** महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त **रत्नागिरी** जिल्हा प्रशासनानं आज परिसर स्वच्छता अभियान राबवलं. तसंच जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आलं.

**<><><><><>**

सांगली जिल्हा परिषदेच्या वतीनं स्वच्छता हीच सेवा अभियान राबविण्यात आलं असून या अभियानात ६९६ ग्रामपंचायतीनी सक्रिय सहभागी घेऊन हे अभियान यशस्वी केलं. या अभियानाविषयी बोलताना सांगली जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे म्हणाल्या....

**होल्ड बाईट - तृप्ती धोडमिसे (४६ सेकंद)**

**<><><><><>**

पुण्यात बावधन इथं आज सकाळी हेलिकॉप्टर कोसळून झालेल्या दुर्घटनेत तीन जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये दोन वैमानिक आणि एका अभियंत्याचा समावेश आहे. हे हेलिकॉप्टर पुण्याहून मुंबईच्या दिशेने निघालं होतं. बावधन परिसरातून आज सकाळी पावणे सात वाजता हेलिकॉप्टरने धुके असताना देखील उड्डाण केलं, त्यानंतर हा अपघात झाला. घटनास्थळी पुणे महानगरपालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तसंच अग्निशमन दलाकडून बचावकार्य करण्यात आलं.

**<><><><><>**

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातला मुख्य आरोपी अक्षय शिंदे याच्या मृत्यूचा तपास करण्यासाठी न्यायालयीन आयोगाची स्थापना करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. निवृत्त न्यायाधीश दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखालचा हा एक सदस्यीय आयोग या प्रकरणातली पोलिसांची भूमिका, तसंच इतर संबंधित बाबींचा तपास करेल. अक्षय शिंदेला तळोजा कारागृहातून रायगडला नेत असताना पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत २३ सप्टेंबर रोजी तो ठार झाला होता.

**<><><><><>**

देशातल्या १४ पूरग्रस्त राज्यांना केंद्रसरकारने पाच हजार आठशे पन्नास कोटी रुपयांहून अधिक निधी जारी केला आहे. यामध्ये महाराष्ट्राला एक हजार चारशे

९२ कोटी रुपये, आंध्र प्रदेशाला एक हजार कोटी रुपये, गुजरातला ६०० कोटी रुपये आणि तेलंगणाला चारशे सतरा कोटी रुपयांचा निधी मिळाला आहे. या राज्यांना यावर्षी अतिवृष्टी, पूर आणि भूस्खलनाचा फटका बसला.

**<><><><>**

शारदीय नवरात्रोत्सवाला उद्यापासून प्रारंभ होत असून त्यानिमित्त बाजारपेठा सजल्या आहेत. आश्विन शुद्ध प्रतिपदेला घटस्थापना केली जाते.  नवरात्रीच्या नऊ दिवसात देवीच्या नऊ रुपांची पूजा केली जाते. यंदा पावसाचं सावट असूनही सजावटीसह लागणारं साहित्य, मातीचे घट, झेंडूची फुलं यांच्या खरेदीसाठी राज्यात बहुतेक सर्व बाजारपेठांमध्ये गर्दी दिसून येत आहे. घरगुती तसंच सार्वजनिक मंडळांमध्ये देवीच्या प्रतिष्ठापनेची तयारी मोठ्या उत्साहात सुरु आहे. रंग, उत्साह आणि आनंदाचं प्रतीक असलेल्या या नवरात्रीनिमित्त सर्वत्र उत्साहाचं वातावरण आहे.

**<><><><>**

खो -खो या देशी खेळाची पहिली विश्वचषक स्पर्धा पुढच्या वर्षी भारतात होईल, असं भारतीय खो- खो महासंघ आणि आंतरराष्ट्रीय खो- खो महासंघानं आज जाहीर केलं. ५४ देशांमध्ये हा खेळ खेळला जातो,  या स्पर्धेत मात्र ६ खंडातले २४ देशांतले १६ पुरुष संघ आणि तितकेच महिला संघ सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा आठवडाभर चालेल. या स्पर्धेमुळे या खेळाला असलेल्या समृद्ध वारशाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतली जाणार आहे. आधी मातीत खेळला जाणारा हा खेळ आता मॅटवर खेळला जातो.  या स्पर्धेच्या निमित्तानं भारतीय महासंघ १० शहरांमधल्या २०० शाळांमधे सदस्यत्व मोहीम राबवणार आहे.

**<><><><>**

इंटरनॅशनल शूटिंग स्पोर्ट फेडरेशनतर्फे आयोजित ज्युनियर वर्ल्ड चॅम्पियनशिप नेमबाजी स्पर्धेत महिलांच्या २५ मीटर पिस्तुल प्रकारात भारताच्या दिवांशी हिने सुवर्ण पदक पटकावलं. तसंच, भारताच्या तेजस्विनी, दिवांशी आणि विभूती भाटिया यांनी महिलांच्या २५ मीटर पिस्तुल स्पर्धेच्या सांघिक प्रकारात देखील सुवर्ण पदकाची कमाई केली. सध्या या स्पर्धेत भारत १० सुवर्ण, एक रौप्य आणि तीन कांस्यपदक अशा १४ पदकांसह पदकतालिकेत आघाडीवर आहे.

**<><><><><>**

दृष्यकलेच्या क्षेत्रात भरीव कार्य करणाऱ्यांना राज्यशासनातर्फे देण्यात येणारा वासुदेव गायतोंडे कला जीवन गौरव पुरस्कार ज्येष्ठ चित्रकार लक्ष्मण श्रेष्ठ यांना जाहीर झाला आहे. सन २०२२-२३ साठीच्या  पुरस्कारासाठी शोधसमितीची बैठक उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली काल झाली. त्यात हा निर्णय घेण्यात आला. पाच लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असं पुरस्काराचं स्वरुप आहे.

**//<><><><><>//**